महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

## सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

# महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६.

(दिनांक २५ मे २०१७ पर्यंत सुधारित)

## Maharashtra Act No. III of 2017

# MAHARASHTRA METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY ACT, 2016

(*As modified upto the 25th May 2017*)

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक,
शासन मुद्रण लेखनसामग्री व प्रकाशने महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

**२०१७**

[**किंमत :** रुपये ४२-००]

## सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३

# महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६

**अनुक्रमणिका**


**उद्देशिका.**

| कलमे | | | | पृष्ठे |
|---|---|---|---|---|
| | प्रकरण एक<br>**प्रारंभिक** | | | |
| १ | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ | ... | ... | १ |
| २ | व्याख्या | ... | ... | २ |
| | प्रकरण दोन<br>**प्राधिकरणाची स्थापना व रचना** | | | |
| ३ | महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना | ... | ... | ३ |
| ४ | महानगर प्राधिकरणाची रचना | ... | ... | ४ |
| ५ | अध्यक्ष आणि महानगर आयुक्त यांचे अधिकार व कर्तव्ये | ... | ... | ५ |
| ६ | महानगर प्राधिकरणाच्या बैठकी | ... | ... | ६ |
| ७ | कार्यकारी समितीची रचना व कार्ये | ... | ... | ७ |
| ८ | प्राधिकरण व कार्यकारी समिती यांचे आदेश इत्यादी अधिप्रमाणित करणे | | ... | ८ |
| ९ | समित्यांची रचना | ... | ... | ८ |
| १० | राज्य विधानमंडळाचे किंवा स्थानिक प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडणूक लढविण्यास किंवा सदस्य म्हणून राहण्यास सदस्य निरर्ह न ठरणे. | | | ९ |
| ११ | शासकीय व स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना सहाय्यासाठी किंवा सल्ला देण्यासाठी निमंत्रित करण्याची तरतूद. | | | ९ |
| | प्रकरण तीन<br>**अधिकारी व कर्मचारी** | | | |
| १२ | अधिकारी व कर्मचारी | ... | ... | ९ |

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| | प्रकरण चार<br>**प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये** | |
| १३ | महानगर प्राधिकरणाची कार्ये ... ... | १० |
| १४ | महानगर प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्राधिकरणाने किंवा व्यक्तीने विवक्षित विकासकाम हाती न घेणे. | ११ |
| १५ | महानगर प्राधिकरणाचा विवक्षित प्रकरणात निदेश देण्याचा अधिकार ... | १२ |
| १६ | स्थानिक प्राधिकरणास विवक्षित प्रकरणांमध्ये जबाबदारी घेण्यास फर्माविण्याचा महानगर प्राधिकरणाचा अधिकार. | १३ |
| १७ | कोणत्याही योजनेची अंमलबजावणी करण्याचा महानगर प्राधिकरणाचा अधिकार ... | १३ |
| १८ | विवक्षित कंपन्यांच्या किंवा सहकारी संस्थांच्या भाग भांडवलासाठी अभिदान देण्याचा महानगर प्राधिकरणाचा अधिकार. | १४ |
| १९ | महानगर प्रदेशातील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली असलेल्या क्षेत्रामध्ये सुविधा पुरविण्याचा प्राधिकरणाचा अधिकार. | १५ |
| | प्रकरण पाच<br>**वित्तव्यवस्था, अर्थसंकल्प आणि लेखे** | |
| २० | महानगर प्राधिकरणाचे निधी ... ... | १५ |
| २१ | कर्ज निधी ... ... | १६ |
| २२ | राखीव व इतर निधी ... ... | १७ |
| २३ | निधी, इत्यादींचे उपयोजन ... ... | १७ |
| २४ | महानगर प्राधिकरणाचे कर्ज घेण्याचे अधिकार ... ... | १७ |
| २५ | प्रकल्प व परियोजना यांना वित्तपुरवठा करण्याचे व त्यासाठी शर्ती लादण्याचे महानगर प्राधिकरणाचे अधिकार. ... | १७ |
| २६ | प्राधिकरणाने घेतलेल्या किंवा दिलेल्या कर्जास शासनाची हमी ... ... | १७ |
| २७ | लेखे व लेखापरीक्षा ... ... | १८ |
| २८ | अर्थसंकल्प ... ... | १८ |
| २९ | वार्षिक अहवाल ... ... | १८ |
| ३० | प्राधिकरणाने तोट्यात कामे पार न पाडणे ... ... | १८ |
| | प्रकरण सहा<br>**करविषयक अधिकार** | |
| ३१ | जमिनी व इमारती यांवर उपकर बसविण्याचे अधिकार ... ... | १८ |
| ३२ | सुधार आकार बसविण्याचा महानगर प्राधिकरणाचा अधिकार ... ... | १९ |

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ३३ | महानगर प्राधिकरणाकडून सुधार आकारांचे निर्धारण ... ... | २० |
| ३४ | लवादाकडून सुधार आकार निश्चित करणे ... ... | २० |
| ३५ | सुधार आकार प्रदान करणे ... ... | २० |
| ३६ | सुधार आकार हा, जमिनीवरील प्रथम भार असणे ... ... | २० |

प्रकरण सात

**महानगर प्राधिकरणाला विवक्षित अधिनियमिती फेरबदलासह किंवा फेरबदलाविना लागू असणे किंवा त्यांपासून सूट मिळणे**

| | | |
|---|---|---|
| ३७ | प्राधिकरणाला विवक्षित अधिनियम विवक्षित फेरबदल इत्यादींसह लागू असणे ... | २१ |

प्रकरण आठ

**संकीर्ण**

| | | |
|---|---|---|
| ३८ | प्राधिकरणाला देय असलेल्या रकमांची जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुली करणे. ... | २१ |
| ३९ | स्थानिक प्राधिकरणांकडून आकारण्यात आलेल्या करांऐवजी प्राधिकरणाने एकरकमी अंशदान करणे. ... | २२ |
| ४० | विवक्षित प्रकरणांत प्राधिकरणाची मागणी पूर्ण करण्यासाठी पगारातून किंवा वेतनातून कपात करणे. ... | २२ |
| ४१ | राज्य शासनाचे नियंत्रण असणे ... ... | २२ |
| ४२ | प्राधिकरणाचा विवरणपत्रे, अहवाल इत्यादी मागविण्याचा अधिकार ... | २३ |
| ४३ | अधिकार सोपवणे ... ... | २३ |
| ४४ | महानगर प्राधिकरणाचे अधिकारी व इतर कर्मचारी लोकसेवक असणे ... | २३ |
| ४५ | पोलिसांनी सहकार्य करणे ... ... | २३ |
| ४६ | संरक्षण ... ... | २३ |
| ४७ | नियम करण्याचा अधिकार ... ... | २३ |
| ४८ | विनियम करण्याचा अधिकार ... ... | २४ |
| ४९ | या अधिनियमाच्या तरतुदींचा अधिभावी परिणाम असणे ... ... | २४ |
| ५० | अडचणी दूर करण्याचा अधिकार ... ... | २४ |
| ५१ | निरसण व व्यावृत्ती ... ... | २४ |
| | अनुसूची ... ... | २५ |

## (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३)

## महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक १० जानेवारी २०१७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) (तरतुदी पुढे चालू ठेवणे) अधिनियम, १९९९ याच्या कलम २ च्या खंड (क) अन्वये महानगर क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या विवक्षित क्षेत्रांच्या उचित, सुव्यवस्थित व शीघ्र विकासाचे समन्वयन व पर्यवेक्षण करण्याच्या आणि अशा विकासाच्या योजना, प्रकल्प व परियोजना यांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ, अशा प्रदेशातील क्षेत्रांकरिता प्राधिकरणे स्थापन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

२०१६ चा महा. अध्या. ११.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश, २०१६ हा दिनांक १३ जून २०१६ रोजी प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक १८ जुलै २०१६ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करण्यासाठी महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विधेयक, २०१६ (सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२) हे, महाराष्ट्र विधानसभेने दिनांक २७ जुलै २०१६, रोजी संमत केले होते आणि महाराष्ट्र विधानपरिषदेकडे ते पारेषित करण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** त्यानंतर महाराष्ट्र विधानपरिषदेची दिनांक ५ ऑगस्ट २०१६ रोजी सत्र समाप्ती झाल्यामुळे महाराष्ट्र विधानपरिषदेत उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यानंतर म्हणजेच, २८ ऑगस्ट २०१६ या दिनांकानंतर, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद झाले असते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक ३० ऑगस्ट २०१६ रोजी महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " पुढे चालू ठेवणे अध्यादेश " असा करण्यात आला आहे) हा प्रख्यापित केला होता ; २०१६ चा महा. अध्या. २२.

**आणि ज्याअर्थी,** उक्त पुढे चालू ठेवणे अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ असे म्हणावे.

(२) तो, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ याच्या कलम २ च्या खंड (ब) मध्ये व्याख्या केलेल्या, मुंबई महानगर प्रदेश आणि भारताचे संविधान याच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद घ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून भारताच्या राष्ट्रपतींनी वेळोवेळी घोषित केलेली अनुसूचित क्षेत्रे वगळता संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल. १९७५ चा महा. ४.

(३) तो, दिनांक १३ जून २०१६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " सोयीसुविधा " यामध्ये, मार्ग, पूल, दळणवळणाची इतर कोणतीही साधने, परिवहन, पाणीपुरवठा व वीजपुरवठा, ऊर्जेचा इतर कोणताही स्रोत, रस्त्यांवरील दिवे, जलनिस्सारण, मलनिस्सारण व साफसफाई, आणि राज्य शासनास, वेळोवेळी, प्राधिकरणाशी विचारविनिमय करून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी सोयीसुविधा म्हणून विनिर्दिष्ट करता येतील अशा इतर कोणत्याही सुविधा, यांचा समावेश होतो ;

(ख) " प्राधिकरण " किंवा " महानगर प्राधिकरण " याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन केलेले प्राधिकरण, असा आहे ;

(ग) " विकास " या शब्दाचा, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह अर्थ, कोणत्याही जमिनीतील किंवा जमिनीवरील किंवा जमिनीखालील (यात समुद्र, खाडी, नदी, सरोवर यांखालील किंवा इतर कोणत्याही पाण्याखालील जमिनीचा समावेश होतो) इमारत बांधकामे, अभियांत्रिकी कामे, खाणकाम किंवा इतर कामे पार पाडणे अथवा कोणत्याही इमारत बांधकामामध्ये किंवा जमिनीमध्ये कोणतेही महत्त्वपूर्ण बदल करणे, किंवा कोणत्याही इमारत बांधकामाच्या किंवा जमिनीच्या वापराच्या बाबतीत कोणताही महत्त्वाचा बदल करणे, असा आहे आणि त्यात, कोणत्याही जमिनीच्या पुनर्विकासाचा व आराखड्याचा व उप-विभागाचा तसेच सोयीसुविधांच्या तरतुदींचाही व प्रकल्पांचाही आणि कृषि, उद्यान विषयक, पुष्पसंवर्धन, वनीकरण, दुग्धव्यवसाय विकास, कुक्कुटपालन, वराहपालन, पशुपैदास, मत्स्यव्यवसाय यांविषयक विकास परियोजनांचा व यासारखे इतर तत्सम उपक्रम यांचाही समावेश होतो आणि " विकास करणे " या शब्दप्रयोगाचा अर्थ, त्यानुसार लावला जाईल ;

(घ) " विकास योजना " याचा अर्थ, या अधिनियमामध्ये व्याख्या केलेल्या महानगर प्रदेशाच्या विकासाकरिता किंवा त्याच्या कोणत्याही भागाकरिता, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाच्या तरतुदींन्वये तयार केलेली त्या त्या वेळी अंमलात असलेली योजना, असा आहे आणि त्यात, उक्त प्रदेशासाठी किंवा त्याच्या कोणत्याही भागासाठी तयार करण्यात आलेल्या प्रारूपाचा किंवा अंतिम विकास योजनेचा,—मग ती या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर त्या त्या वेळी करण्यात आलेली असो— यांचा समावेश होतो ;

(ङ) " कार्यकारी समिती " याचा अर्थ, कलम ७ अन्वये घटित केलेली कार्यकारी समिती, असा आहे ;

(च) " जमीन " या संज्ञेत, जमिनीपासून मिळणारे लाभ, आणि भूमीस संलग्न असलेल्या वस्तू किंवा भूमीस संलग्न असलेल्या कोणत्याही गोष्टीशी स्थायी स्वरूपात निगडित केलेल्या वस्तू, यांचा समावेश होतो ;

१९६६ चा महा. ३७. (छ) " महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६, असा आहे ;

(ज) " महानगर आयुक्त " याचा अर्थ, कलम १२च्या पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेला महानगर आयुक्त, असा आहे ;

२००० चा महा. ५. (झ) " महानगर नियोजन समिती अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) (तरतुदी पुढे चालू ठेवणे) अधिनियम, १९९९, असा आहे ;

(ञ) " महानगर प्रदेश " याचा अर्थ, महानगर नियोजन समिती अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (क) अन्वये व्याख्या केलेले महानगर क्षेत्र, असा आहे ;

(ट) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ठ) " प्रादेशिक योजना " याचा अर्थ, या अधिनियमात व्याख्या केलेल्या महानगर प्रदेशाच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या विकासाकरिता किंवा पुनर्विकासाकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाच्या तरतुदींन्वये तयार केलेली त्या त्या वेळी अंमलात असलेली योजना, असा आहे आणि त्यात, उक्त प्रदेशाच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाकरिता तयार केलेल्या प्रारूप किंवा अंतिम प्रादेशिक योजनेचा,–मग ती या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर करण्यात आलेली असो—यांचा समावेश होतो :

परंतु, प्रादेशिक योजनेचा, महानगर नियोजन समिती अधिनियमाच्या तरतुदींन्वये महानगर नियोजन समितीने तयार केलेली विकास योजना, असाही अर्थ होईल.

(ड) " विनियम " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेले विनियम, असा आहे ;

(ढ) " नियम " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेले नियम, असा आहे.

(२) या अधिनियमात वापरलेले आणि यात वर व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमात त्यांना, अनुक्रमे, जे अर्थ नेमून देण्यात आले असतील, तेच अर्थ असतील.

## प्रकरण दोन

## **प्राधिकरणाची स्थापना व रचना**

**३.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर होईल तितक्या लवकर राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, प्रत्येक महानगर प्रदेशाकरिता " ....... महानगर प्रदेश विकास प्राधिकरण " या नावाने संबोधण्यात येणारे एक प्राधिकरण स्थापन करता येईल. महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना.

(२) महानगर प्राधिकरण हा, अखंड परंपरा व सामायिक मुद्रा असलेला एक निगमनिकाय असेल. त्यास या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, जंगम व स्थावर अशा दोन्ही प्रकारच्या मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा आणि तिचा विनियोग करण्याचा, आणि करार करण्याचा अधिकार असेल आणि त्याला त्याच्या उपरोक्तप्रमाणे निगम नावाने दावा लावता येईल, किंवा त्याच्यावर दावा दाखल करता येईल.

(३) महानगर प्राधिकरण, महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे, १९०४
" स्थानिक प्राधिकरण " या संज्ञेच्या अर्थांतर्गत एक स्थानिक प्राधिकरण म्हणून असल्याचे मानण्यात चा १.
येईल.

महानगर प्राधिकरणाची रचना.

**४.** (१) कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये प्राधिकरणाची स्थापना झाल्याच्या दिनांकास आणि त्या दिनांकापासून, महानगर प्राधिकरणात पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) मुख्यमंत्री.

(दोन) नगर विकास मंत्री.

(तीन) गृहनिर्माण मंत्री.

(चार) जिल्ह्याचा पालक मंत्री.

(पाच) नगर विकास, राज्यमंत्री.

(सहा) महानगर प्रदेशामधील महानगरपालिकांचे महापौर.

(सात) महानगर प्रदेशातील महानगरपालिकांच्या स्थायी समित्यांचे अध्यक्ष.

(आठ) राज्य शासनाने आदेशाद्वारे, आळीपाळीने निश्चित करावयाचे, महानगर प्रदेशामधील नगर परिषदांचे दोन अध्यक्ष.

(नऊ) महानगर प्रदेशातील जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.

(दहा) राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात यावयाचे, महानगर प्रदेशाच्या हद्दीमध्ये पूर्णतः किंवा अंशतः येणाऱ्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे महाराष्ट्र विधानसभेचे चार सदस्य.

(अकरा) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा, महाराष्ट्र विधानपरिषदेचा एक सदस्य.

(बारा) महाराष्ट्र शासनाचा मुख्य सचिव किंवा त्याने प्राधिकृत केलेला, सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला इतर कोणताही अधिकारी.

(तेरा) महानगर प्रदेशातील महानगरपालिकांचे महानगरपालिका आयुक्त.

(चौदा) महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाचा सचिव.

(पंधरा) महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाचा सचिव.

(सोळा) ज्याचा जास्तीत जास्त भाग त्या प्रदेशात समाविष्ट असेल अशा विशेष नियोजन प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी.

(सतरा) संबंधित प्रदेशाचे विभागीय आयुक्त आणि पोलीस आयुक्त.

(अठरा) महानगर आयुक्त.

(२) महाराष्ट्राचा मुख्यमंत्री अध्यक्ष असेल ; आणि राज्य शासनाने सदस्यांमधून नामनिर्देशित करावयाची एक व्यक्ती सह-अध्यक्ष असेल. महानगर आयुक्त हा प्राधिकरणाचा सदस्य-सचिव असेल.

(३) कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये प्राधिकरणाची स्थापना झाल्याच्या दिनांकापासून एखाद्या सदस्याचे नामनिर्देशन किंवा नियुक्ती करता येऊ न शकल्यामुळे किंवा एखादा सदस्य इतर कोणत्याही कारणामुळे त्या दिवशी पद ग्रहण करण्यास उपलब्ध होऊ न शकल्यामुळे, कोणतेही पद रिक्त राहिले

असले तरी, प्राधिकरण यथोचितरीत्या घटित करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि वेळोवेळी उपलब्ध होतील असे प्राधिकरणाचे सदस्य, त्या दिनांकापासून, प्राधिकरणाच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यास, सर्व कर्तव्ये पार पाडण्यास व सर्व कामे करण्यास, सक्षम असतील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाच्या कलम ४२ क अन्वये घटित केलेले " प्राधिकरण ", त्या अधिनियमाच्या कलम ४२ अ अन्वये अधिसूचित केलेल्या क्षेत्राकरिता या अधिनियमान्वये प्राधिकरण घटित करण्यात येईपर्यंत, त्याची कामे व कर्तव्ये पार पाडणे पुढे चालू ठेवील.

(४) राज्य शासनास, वेळोवेळी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पोट-कलम (१) च्या खंड (दहा) व (अकरा) अन्वये नामनिर्देशित केलेल्या सदस्यांची नावे प्रसिद्ध करता येतील.

(५) सदस्यांना, प्राधिकरणाच्या किंवा त्याच्या कोणत्याही समितीच्या अथवा मंडळाच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी किंवा सदस्य म्हणून अन्य कोणतेही कार्य पार पाडण्यासाठी विनियमाद्वारे निर्धारित करता येतील असे भत्ते मिळतील. या विनियमास राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेची आवश्यकता असेल.

(६) कोणतीही व्यक्ती, विधानमंडळाचे किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचे, किंवा समितीचे किंवा मंडळाचे कोणतेही पद धारण करीत असल्याच्या अथवा त्याचा सदस्य असल्याच्या नात्याने प्राधिकरणाची सदस्य झाली असेल किंवा सदस्य म्हणून निवडून आली असेल अथवा नामनिर्देशित करण्यात आली असेल त्याबाबतीत, तिने ते पद धारण करण्याचे किंवा, यथास्थिति, असा सदस्य म्हणून असण्याचे बंद होताच, ती प्राधिकरणाचा सदस्य असण्याचे बंद होईल.

(७) प्राधिकरणाचा पदसिद्ध सदस्य वगळता अन्य कोणत्याही सदस्यास, अध्यक्षाला उद्देशून आपल्या सहीनिशी, आपल्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल.

(८) महानगर प्राधिकरणाची किंवा त्याच्या कोणत्याही समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, केवळ पुढील कोणत्याही कारणांवरून विधिअग्राह्य असल्याचे मानण्यात येणार नाही,—

(क) प्राधिकरणाचा किंवा त्याच्या कोणत्याही समितीचा कोणताही सदस्य रीतसर निवडून न येणे, नामनिर्देशित न करणे किंवा नियुक्त न करणे अथवा अन्य कोणत्याही कारणाने प्राधिकरणाच्या किंवा त्याच्या समितीच्या रचनेच्या वेळी किंवा कोणत्याही बैठकीच्या वेळी पदग्रहण करण्यास उपलब्ध नसणे, अथवा त्यांच्या रचनेमध्ये कोणताही दोष असणे, अथवा कोणतीही व्यक्ती एकाहून अधिक पदाच्या नात्याने सदस्य असणे, अथवा अशा कोणत्याही सदस्यांची एक किंवा त्याहून अधिक पदे रिक्त असणे ;

(ख) प्राधिकरणाच्या किंवा अशा समितीच्या अथवा मंडळाच्या कार्यपद्धतीमध्ये, विचाराधीन प्रकरणाच्या गुणावगुणांवर परिणाम न करणारी कोणतीही अनियमितता असणे.

अध्यक्ष आणि महानगर आयुक्त यांचे अधिकार व कर्तव्ये.

**५.** (१) प्राधिकरणाचा अध्यक्ष हा, प्राधिकरणाच्या वतीने सर्व कार्यांचे पर्यवेक्षण आणि नियंत्रण करील आणि या अधिनियमाद्वारे त्याला प्रदान करण्यात आलेले असतील अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील आणि प्राधिकरण वेळोवेळी विनियमांद्वारे निर्धारित करील अशा अन्य अधिकारांचा वापर करील व अशी अन्य कर्तव्ये पार पाडील :

परंतु, अध्यक्षास, त्याला प्रदान करण्यात आलेले कोणतेही अधिकार व कर्तव्ये ही, सह-अध्यक्षाकडे सोपविता येतील.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींना अधीन राहून,—

(क) महानगर आयुक्त हा, प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल ; आणि तो, प्राधिकरण या बाबतीत संमत केलेल्या ठरावाद्वारे निदेश देईल, अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कार्ये किंवा कर्तव्ये पार पाडील. महानगर आयुक्तास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, आणखी असाही निदेश देता येईल की, उपरोक्तप्रमाणे किंवा कलम ७ च्या पोट-कलम (५) अन्वये त्याला सोपविलेले असतील असे अधिकार किंवा कार्ये किंवा कर्तव्ये अशा आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून वापरण्यात येतील किंवा पार पाडण्यात येतील ;

(ख) महानगर आयुक्त, प्राधिकरणाच्या सर्व अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे तसेच प्राधिकरणात किंवा त्याच्या कोणत्याही समितीवर किंवा मंडळावर शासनाने वेळोवेळी नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांचे पर्यवेक्षण करील व त्यांवर नियंत्रण ठेवील ;

(ग) महानगर आयुक्त, प्राधिकरणाला देय असलेल्या सर्व रकमा वसूल करण्यास आणि प्राधिकरणाकडून देय असलेल्या सर्व रकमा प्रदान करण्यास जबाबदार असेल. तो, प्राधिकरणाच्या रोख शिल्लक रकमांसह सर्व मत्ता पर्याप्तपणे सुरक्षित असल्याची सुनिश्चिती करील. तसेच, तो, प्राधिकरणाच्या कामांसंबंधातील सर्व कार्यकारी कार्ये पार पाडण्यासदेखील जबाबदार असेल.

(३) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, कार्यकारी समिती, वेळोवेळी, आदेशाद्वारे, कलम १२ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही अपर, उप आणि सहायक महानगर आयुक्तांचे अधिकार व कर्तव्ये निर्धारित करील.

महानगर प्राधिकरणाच्या बैठकी.

**६.** (१) महानगर प्राधिकरणाची सहा महिन्यांतून किमान एकदा, अध्यक्ष ठरवील अशा ठिकाणी व अशा वेळी बैठक होईल आणि ते आपल्या बैठकीमध्ये पोट-कलम (३) च्या तरतुदींच्या अधीनतेने, विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येईल अशा (तिच्या गणपूर्तीसह) कामकाज चालविण्यासंबंधातील नियमांचे व कार्यपद्धतीचे पालन करील.

(२) अध्यक्ष हा, प्राधिकरणाच्या बैठकींचे अध्यक्षपद भूषवील. कोणत्याही बैठकीत अध्यक्ष अनुपस्थित असल्यास, सह-अध्यक्ष अध्यक्षपद भूषवील आणि दोघेही अनुपस्थित असल्यास, बैठकीत उपस्थित असलेल्या सदस्यांनी निवडून दिलेला प्राधिकरणाचा अन्य कोणताही सदस्य त्या बैठकीचे अध्यक्षपद भूषवील.

(३) प्राधिकरणाकडून किंवा त्याच्या वतीने करण्यात आलेल्या किंवा करण्याचे प्रस्तावित असलेल्या कोणत्याही कंत्राटामध्ये, कर्जामध्ये, संव्यवस्थेमध्ये किंवा प्रस्तावामध्ये, ज्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या, कोणताही हिस्सा किंवा आर्थिक किंवा अन्य हितसंबंध असेल अथवा ज्याने तो संपादित केलेला असेल असा प्राधिकरणाचा सदस्य हा, त्या प्राधिकरणाचा सदस्य असण्याचे बंद होईल :

परंतु, एखादा सदस्य अशा कोणत्याही कंत्राटामध्ये, कर्जामध्ये, संव्यवस्थेमध्ये किंवा प्रस्तावामध्ये एखाद्या संबंधित सार्वजनिक मर्यादित कंपनीमध्ये भागधारक असणे, अथवा तो स्वतः किंवा त्याचा

कोणताही नातेवाईक हा प्राधिकरणाकडून किंवा त्याच्या वतीने नियुक्त करण्यात आलेला असणे, अथवा प्राधिकरणाचा एक सदस्य म्हणून त्याच्या पदाच्या नात्याने त्याचा तसा हिस्सा किंवा हितसंबंध असणे, अथवा त्याची मालमत्ता, किंवा ज्या मालमत्तेत त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल ती मालमत्ता, प्राधिकरणाकडून किंवा त्याच्या वतीने करारावर किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार संपादन करण्यात किंवा घेण्यात आलेली असणे, केवळ एवढ्याच कारणांवरून त्याचा असा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असल्याचे मानले जाणार नाही.

(४) प्राधिकरणाचा एखादा सदस्य हा, लगतपूर्वीच्या पोट-कलमामध्ये नमूद केलेल्या अनर्हतेस पात्र ठरला आहे किंवा कसे याबाबत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, तो प्रश्न राज्य शासनाकडे निर्णयार्थ निर्देशित करण्यात येईल आणि त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

कार्यकारी समितीची रचना व कार्ये.

**७.** (१) प्राधिकरणाची एक कार्यकारी समिती असेल, ती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(एक) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन किंवा त्याने प्राधिकृत केलेला सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा अन्य कोणताही अधिकारी.

(दोन) शासनाच्या नगरविकास विभागाचा सचिव किंवा त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी.

(तीन) शासनाच्या गृहनिर्माण विभागाचा सचिव किंवा त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी.

(चार) शासनाच्या वित्त विभागाचा सचिव किंवा त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी.

(पाच) महानगर आयुक्त.

(सहा) महानगर प्रदेशातील महानगरपालिकांचे महानगरपालिका आयुक्त.

(सात) ज्याचे जास्तीत जास्त क्षेत्र त्या प्रदेशामध्ये समाविष्ट असेल अशा, विशेष नियोजन प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी.

(आठ) संबंधित प्रदेशाचे पोलीस आयुक्त.

(नऊ) राज्य शासनाने नियुक्त करावयाचे, नगर नियोजन व विकास क्षेत्रातील तज्ज्ञ असलेले तीन सदस्य.

(दहा) प्राधिकरणाचा प्रधान लेखा व वित्त अधिकारी.

(२) महाराष्ट्र शासनाचा मुख्य सचिव किंवा त्याने प्राधिकृत केलेला, सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा इतर कोणताही अधिकारी कार्यकारी समितीचा अध्यक्ष असेल. महाराष्ट्र शासनाचा मुख्य सचिव, योग्य त्या व्यक्तीची कार्यकारी समितीचा सचिव म्हणून नियुक्ती करील.

(३) कलम २८ च्या तरतुदींना आणि प्राधिकरणाने घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा दिलेले निदेश यांना अधीन राहून, कार्यकारी समिती पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(एक) कर्मचारीवर्गाची नियुक्ती ;

(दोन) प्राधिकरणाच्या प्रकल्पांच्या आणि परियोजनांच्या मंजुरी किंवा नामंजुरीसह अशा प्रकल्पांचे किंवा परियोजनांचे नियोजन आणि कार्यान्वयन करणे ;

(तीन) प्रकल्प आणि परियोजनासाठीच्या निविदांना मंजुरी किंवा नामंजुरी देणे ;

(चार) कलम १४ च्या पोट-कलम (३) अन्वये, प्राधिकरणाच्या वतीने परवानगी देणे किंवा परवानगी नाकारणे ;

(पाच) महानगर प्रदेश विकास निधीतील अतिरिक्त पैशांची गुंतवणूक करणे ;

(सहा) प्राधिकरणाच्या वतीने कोणतीही कायदेशीर कार्यवाही सुरू करणे, चालवणे आणि ती मागे घेणे ;

(सात) प्राधिकरणाने वेळोवेळी कार्यकारी समितीला सोपविलेल्या अधिकारांचा (विनियम करण्याच्या अधिकाराव्यतिरिक्त) वापर करणे किंवा सोपविलेल्या कार्यांचे किंवा कर्तव्यांचे पालन करणे.

(४) कार्यकारी समितीचा अध्यक्ष ठरविल अशा ठिकाणी आणि अशा वेळी कार्यकारी समितीची बैठक होईल, आणि ती समिती निर्धारित करील अशा कार्यपद्धतीविषयक नियमांचे पालन करण्यात येईल.

(५) कार्यकारी समिती, वेळोवेळी, या बाबतीत संमत करण्यात आलेल्या ठरावांद्वारे असे निदेश देईल की, या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा त्याअन्वये समितीला प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारांचा महानगर आयुक्ताकडून वापर करण्यात येईल आणि त्यांच्याकडून कोणतेही कार्य किंवा कर्तव्य पार पाडण्यात येईल.

(६) या अधिनियमान्वये महानगर प्राधिकरणांकडून वापरण्यात येणाऱ्या अधिकारांना बाध न येता आणि महानगर प्रदेशातील नियोजन प्राधिकरणांकडून किंवा स्थानिक प्राधिकरणांकडून अधिकारांचा वापर केला जात असला तरी, महानगर प्रदेशातील कोणत्याही भागाचा योग्य, सुव्यवस्थित व शीघ्र विकास करण्याच्या बाबतीत फक्त अशी नियोजन प्राधिकरणे किंवा स्थानिक प्राधिकरणे यांमध्ये असलेले कोणतेही मतभेद किंवा विवाद हे प्राधिकरणाकडे निर्णयार्थ सोपविण्यात येतील, त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल आणि तो निर्णय नियोजन प्राधिकरणांवर आणि स्थानिक प्राधिकरणांवर बंधनकारक असेल.

प्राधिकरण व कार्यकारी समिती यांचे आदेश इत्यादी अधिप्रमाणित करणे.

**८.** प्राधिकरण व कार्यकारी समिती यांची सर्व कार्यवाही ही, प्राधिकरणाच्या किंवा, यथास्थिति, कार्यकारी समितीच्या अध्यक्षाच्या किंवा या बाबतीत अध्यक्षाने प्राधिकृत केलेल्या तिच्या कोणत्याही सदस्याच्या सहीद्वारे अधिप्रमाणित करण्यात येईल आणि प्राधिकरणाचे इतर सर्व आदेश आणि संलेख हे, महानगर आयुक्ताकडून किंवा कार्यकारी समितीच्या सचिवाकडून किंवा या बाबतीत महानगर आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या प्राधिकरणाच्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडून अधिप्रमाणित करण्यात येतील.

समित्यांची रचना.

**९.** (१) महानगर प्राधिकरणास, पूर्णतः प्राधिकरणाच्या सदस्यांनी मिळून किंवा अंशतः इतर व्यक्तींनी मिळून बनलेल्या समित्या घटित करता येतील आणि त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे अशा प्रयोजनासाठी किंवा प्रयोजनांसाठी, समित्या घटित करता येतील आणि महानगर प्राधिकरण, विनियमाद्वारे विनिर्दिष्ट करील असे अधिकार अशा कोणत्याही समितीला सोपविता येतील.

(२) या कलमान्वये घटित केलेल्या समित्यांची बैठक, विनियमांद्वारे तरतूद करण्यात येईल अशा ठिकाणी व अशा वेळी होईल आणि त्या विनियमांद्वारे तरतूद करण्यात येईल अशा, त्यांच्या बैठकीत कामकाज चालविण्यासंबंधातील कार्यपद्धतीविषयक नियमांचे पालन करतील.

(३) समित्यांच्या सदस्यांना, समित्यांच्या बैठकीला उपस्थित राहण्याकरिता आणि समित्यांच्या इतर कोणत्याही कामासाठी उपस्थित राहण्याकरिता वैयक्तिक खर्च भागविण्यासाठी, विनियमांद्वारे तरतूद करण्यात येतील असे भत्ते देण्यात येतील.

राज्य विधानमंडळाचे किंवा स्थानिक प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडणूक लढविण्यास किंवा सदस्य म्हणून राहण्यास सदस्य निरर्ह न ठरणे.

**१०.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या सदस्यास, (प्राधिकरणाचा किंवा त्याच्या कोणत्याही समितीचा अध्यक्ष किंवा सह-अध्यक्ष यांसह), तो प्राधिकरणाचा किंवा त्याच्या कोणत्याही समितीचा सदस्य आहे केवळ या कारणावरून राज्य विधानमंडळाचा किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा किंवा कोणत्याही समितीचा सदस्य किंवा परिषद सदस्य, अशा विधानमंडळाचा किंवा प्राधिकरणाचा सदस्य किंवा त्यांच्या सदस्यमंडळाचा सदस्य म्हणून निवडून दिला जाण्यास किंवा सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह ठरणार नाही.

शासकीय व स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना सहाय्यासाठी किंवा सल्ला देण्यासाठी निमंत्रित करण्याची तरतूद.

**११.** प्राधिकरणास किंवा कार्यकारी समितीस तिला कोणत्याही बाबीवर किंवा बाबींवर सहाय्य करण्याच्या किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनार्थ विशेष किंवा स्थायी निमंत्रिती म्हणून तिच्या बैठकीला किंवा बैठकींना उपस्थित राहण्यासाठी शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्याला निमंत्रित करता येईल. असा निमंत्रित अधिकारी कामकाजामध्ये भाग घेऊ शकेल, परंतु त्यास त्यात मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

## प्रकरण तीन

## **अधिकारी व कर्मचारी**

अधिकारी व कर्मचारी.

**१२.** (१) राज्य शासन, महानगर आयुक्ताची नियुक्ती करील. राज्य शासन आदेशाद्वारे महानगर आयुक्ताचे वेतन आणि त्याच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती वेळोवेळी निर्धारित करील. त्याची नियुक्ती तीन वर्षांहून अधिक नसेल अशा कालावधीकरिता करण्यात येईल आणि त्याची नियुक्ती एका वेळी तीन वर्षांहून अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी वेळोवेळी वाढवता येईल :

परंतु, राज्य शासनास, कोणत्याही वेळी,—

(क) जर महानगर आयुक्ताने राज्याच्या सेवेवर धारणाधिकार ठेवला असेल तर, प्राधिकरणाशी विचारविनिमय केल्यानंतर त्याला अशा सेवेत परत बोलविता येईल ;

(ख) तो आपली पदीय कर्तव्ये पार पाडण्यास समर्थ नसल्याचे किंवा ज्यामुळे त्याला पदावरून काढून टाकणे इष्ट ठरेल अशा कोणत्याही वर्तणुकीबद्दल किंवा निष्काळजीपणाबद्दल तो दोषी असल्याचे, राज्य शासनास दिसून आल्यास, त्याला पदावरून काढून टाकता येईल :

परंतु आणखी असे की, जर महानगर आयुक्ताने राज्याच्या सेवेवर धारणाधिकार ठेवला असेल तर, प्राधिकरणाने त्याला परत पाठविण्यासाठी ठराव संमत करून तशी विनंती केल्यास त्याला अशा सेवेतून तात्काळ परत बोलविता येईल :

परंतु तसेच, महानगर आयुक्तास, प्राधिकरणाच्या अध्यक्षाकडे आपला लेखी राजीनामा देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. परंतु असा राजीनामा प्राधिकरणाच्या अध्यक्षाने स्वीकारल्यावरच अंमलात येईल.

(२) राज्य शासनास, कार्यकारी समितीकडून करण्यात आलेल्या विनंतीवरून एक किंवा अनेक अपर, सह, उप किंवा सहायक महानगर आयुक्तांची नियुक्ती करता येईल. राज्य शासन, आदेशाद्वारे अपर महानगर आयुक्त, महानगर सह आयुक्त, महानगर उपायुक्त आणि सहायक महानगर आयुक्त यांचे वेतन आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती, वेळोवेळी, निर्धारित करील.

(३) प्राधिकरणास त्यास आवश्यक वाटतील अशा प्राधिकरणाचे इतर दुय्यम अधिकारी व कर्मचारी यांच्या पदनिर्मितीस वेळोवेळी मंजुरी देता येईल. असे अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती व सेवा यांच्या शर्ती व त्यांचे अधिकार व कर्तव्ये विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

## प्रकरण चार

## **प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये**

महानगर प्राधिकरणाची कार्ये.

**१३.** (१) प्रादेशिक योजनेनुसार महानगर प्रदेशाचा विकास सुनिश्चित करणे हे प्राधिकरणाचे मुख्य उद्दिष्ट असेल आणि त्या प्रयोजनार्थ, प्राधिकरणाची कार्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(क) कोणत्याही प्राकृतिक, वित्तीय व आर्थिक योजनेचा आढावा घेणे ;

(ख) महानगर प्रदेशात प्रस्तावित केलेला असेल किंवा अंमलबजावणी सुरू केलेली असेल किंवा पूर्ण झालेला असेल अशा कोणत्याही विकास प्रकल्पाचा किंवा परियोजनेचा आढावा घेणे ;

(ग) महानगर प्रदेशाच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या विकासाच्या परियोजना तयार करणे ;

(घ) प्रकल्प व परियोजना कार्यान्वित करणे ;

(ङ) महानगर प्रदेशाच्या सर्वकष विकासासाठी राज्य शासनाकडून किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडून कार्यवाही करण्याची आवश्यकता असलेल्या कोणत्याही प्रकरणाची अथवा प्रस्तावाची राज्य शासनाकडे शिफारस करणे ;

(च) आंतर-प्रादेशिक विकासासाठी अन्य कोणत्याही प्राधिकरणास सहभागी करून घेणे ;

(छ) महानगर प्रदेशाच्या विकासाबद्दलच्या कोणत्याही प्रकल्पाला किंवा परियोजनेला वित्तपुरवठा करणे ;

(ज) महानगर प्रदेशाच्या विकासाबद्दलच्या किंवा परियोजनांच्या अंमलबजावणीचे समन्वयन करणे ;

(झ) ज्याचा संपूर्ण किंवा अंशतः खर्च महानगर प्रदेश विकास निधीतून भागविण्यात येईल अशा कोणत्याही प्रकल्पाचे किंवा परियोजनेचे नियोजन व कार्यान्वयन यांचे पर्यवेक्षण करणे किंवा अन्यथा त्यांचे पर्याप्त पर्यवेक्षण केले जात असल्याची खात्री करणे ;

(ञ) शेती, फलोत्पादन, पुष्पसंवर्धन, वनीकरण, दुग्धव्यवसाय विकास, कुक्कुटपालन, वराहपालन, पशुपैदास, मत्स्यव्यवसाय व अन्य तत्सम उपक्रम यांच्या विकासासाठीच्या परियोजना तयार करणे, व त्या तयार करण्यासाठी व हाती घेण्यासाठी संबंधित प्राधिकरणाला सल्ला देणे ;

(ट) प्रकल्प व परियोजनांमुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींना पर्यायी निवासव्यवस्था पुरविण्यासाठी व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी तशा आवश्यकतांची तरतूद करणाऱ्या परियोजना तयार करणे व त्या अंमलात आणणे ;

(ठ) त्याच्या कार्यवाहीमुळे उद्भवतील अशा आणि ज्या उद्दिष्टांसाठी प्राधिकरण स्थापन करण्यात आले असेल त्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही बाबींकरिता किंवा तद्नुषंगिक किंवा तद्नुकूल बाबींकरिता आवश्यक असतील अशा इतर सर्व कृती व गोष्टी करणे.

(२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्राधिकरण, महानगर नियोजन समिती अधिनियमाखाली घटित करण्यात आलेल्या महानगर नियोजन समितीला त्या अधिनियमान्वये विकास परियोजना तयार करण्यासाठी सहाय्य करील.

(३) प्राधिकरणास, संबंधित नियोजन प्राधिकरणाशी विचारविनिमय करून, महानगर प्रदेशाचा एकात्मिक विकास करण्याच्या प्रयोजनासाठी नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्राकरिता उपरोक्त अधिनियमाखालील विकास योजनांमध्ये फेरबदल किंवा सुधारणादेखील करता येतील आणि या प्रयोजनार्थ, त्यास त्या अधिनियमाखालील नियोजन प्राधिकरणाचे सर्व अधिकार असतील आणि त्याकरता ते राज्य शासनाची मान्यता घेईल.

असे करताना, प्राधिकरण, आपल्या अधिकारितेतील स्थानिक प्राधिकरणांच्या, नियोजन प्राधिकरणांच्या व जिल्हा नियोजन समित्यांच्या आणि महानगर नियोजन समित्यांच्या सर्व संबंधित योजना विचारात घेईल आणि अशा प्रत्येक योजनेतील फेरबदलासाठीची व्याप्ती व कारणे विनिर्दिष्ट करील.

महानगर प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्राधिकरणाने किंवा व्यक्तीने विवक्षित विकासकाम हाती न घेणे.

**१४.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीने असेल ते खेरीज करून, कोणतेही प्राधिकरण किंवा व्यक्ती, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, महानगर प्राधिकरणाकडून वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्रकारचे आणि ज्यामुळे महानगर प्रदेशाच्या संपूर्ण विकासावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असेल असे, कोणतेही विकासकाम, महानगर प्रदेशात हाती घेतले जाणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेले विकासकाम, हाती घेऊ इच्छिणारे कोणतेही प्राधिकरण किंवा व्यक्ती, असे विकासकाम हाती घेण्याच्या परवानगीसाठी महानगर प्राधिकरणाकडे लेखी अर्ज करील.

(३) महानगर प्राधिकरण, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, आणि पोट-कलम (२) अन्वये अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत, कोणत्याही शर्तीविना किंवा त्यास योग्य वाटतील अशा शर्ती लादून, अशी परवानगी देईल, किंवा अशी परवानगी नाकारील. अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत किंवा जर कार्यकारी समितीच्या सचिवाने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने मागणी केलेल्या गोष्टींची, कोणत्याही असल्यास,

पूर्तता झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत, यांपैकी जो नंतरचा कालावधी असेल त्या कालावधीच्या आत, प्राधिकरणाने परवानगी देण्याबाबत किंवा नाकारण्याबाबत आपला निर्णय अर्जदाराला कळविण्यात कसूर केली तर, असा ६० दिवसांचा कालावधी समाप्त झाल्याच्या लगतनंतरच्या दिनांकास, परंतु प्रादेशिक योजनेच्या किंवा अशा विकासकामास त्या त्या वेळी लागू असलेल्या, कोणत्याही विनियमांच्या किंवा विकास नियंत्रण नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, अशी परवानगी देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(४) पोट-कलम (३) खालील महानगर प्राधिकरणाच्या निर्णयाने व्यथित झालेल्या कोणत्याही प्राधिकरणास किंवा व्यक्तीस, चाळीस दिवसांच्या आत, राज्य शासनाकडे अशा निर्णयाविरुद्ध अपील करता येईल, त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल :

परंतु, जेथे असे अपील दाखल करणारे व्यथित प्राधिकरण हे केंद्र सरकारच्या प्रशासकीय नियंत्रणाधीन असेल त्या बाबतीत, केंद्र सरकारशी विचारविनिमय करून, सदर अपिलावर राज्य शासनाकडून निर्णय घेण्यात येईल.

(५) कोणत्याही व्यक्तीने किंवा प्राधिकरणाने, पोट-कलम (३) अन्वये लादलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास किंवा पोट-कलम (४) अन्वये दिलेल्या निर्णयाच्या विरुद्ध कोणतीही गोष्ट केल्यास प्राधिकरणास, अशा निर्णयाच्या विरुद्ध केलेले कोणतेही विकासकाम, पाडून टाकण्याचा, नष्ट करण्याचा किंवा ते काढून टाकण्याचा आणि ते विकासकाम, पाडून टाकण्याचा, नष्ट करण्याचा किंवा ते काढून टाकण्याचा खर्च, संबंधित व्यक्तीकडून किंवा प्राधिकरणाकडून वसूल करण्याचा अधिकार असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, " प्राधिकरण " याचा अर्थ, स्थानिक प्राधिकरण, नियोजन प्राधिकरण, जिल्हा नियोजन समिती व महानगर नियोजन समिती यांच्या खेरीज अन्य प्राधिकरण, असा आहे.

महानगर प्राधिकरणाचा विवक्षित प्रकरणात निदेश देण्याचा अधिकार.

**१५.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, महानगर प्राधिकरणास, कलमे १३ व २५ अन्वये वित्तपुरवठा केलेल्या कोणत्याही विकास प्रकल्पाच्या किंवा परियोजनेच्या बाबतीत त्यास योग्य वाटतील असे निदेश कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला किंवा अन्य प्राधिकरणाला किंवा व्यक्तीला देता येतील आणि त्या प्रदेशातील अशा कोणत्याही प्राधिकरणावर किंवा व्यक्तीवर अशा निदेशांचे अनुपालन करणे बंधनकारक असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही प्राधिकरणाला किंवा व्यक्तीला कोणताही निदेश दिला असेल त्या बाबतीत, अशा प्राधिकरणास किंवा व्यक्तीस, असा निदेश मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, अशा निदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे अपील करता येईल, आणि राज्य शासनाचा त्या अपिलावरील निर्णय अंतिम असेल.

(३) महानगर प्राधिकरण, प्रत्येक विकासविषयक प्रकल्पाची किंवा परियोजनेची अंमलबजावणी ही, महानगर प्रदेशाचा संपूर्ण विकास करण्याच्या दृष्टीने, आणि राज्य शासनाकडून त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये यथोचितरीत्या मान्यता दिलेली कोणतीही योजना, प्रकल्प किंवा परियोजना यांनुसार केली आहे याची सुनिश्चिती करण्यासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे, कलम १३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (झ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या पर्यवेक्षणाबाबतच्या अशा अधिकारांचा वापर करील.

(४) महानगर प्राधिकरणास, पोलीस आयुक्ताला किंवा, यथास्थिति, पोलीस अधीक्षकाला निदेश देण्याचा अधिकार असेल आणि तो पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक जेथवर अशा निदेशांचा विकासकामांची अंमलबजावणी करणे किंवा अनधिकृत विकास कामे काढून टाकणे किंवा या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करणे किंवा त्या प्रदेशात त्यावेळी अंमलात असलेल्या मान्यताप्राप्त विकास योजनेनुसार किंवा प्रादेशिक योजनेनुसार यथोचित विकासाची सुनिश्चिती करणे याच्याशी संबंध असेल तेथवर या निदेशांचे पालन करील.

स्थानिक प्राधिकरणास विवक्षित प्रकरणांमध्ये जबाबदारी घेण्यास फर्मावण्याचा महानगर प्राधिकरणाचा अधिकार.

**१६.** महानगर प्राधिकरणाकडून कोणत्याही सोयीसुविधा पुरविण्यात आल्या असतील त्या बाबतीत, प्राधिकरणास, त्याच्याकडून पुरविण्यात आलेल्या असतील अशा सोयीसुविधांच्या परिरक्षणाची जबाबदारी घेता येईल किंवा त्यास, ज्या स्थानिक प्राधिकरणाच्या हद्दींमध्ये असे विकसित केलेले क्षेत्र स्थित असेल अशा स्थानिक प्राधिकरणाला त्या सोयीसुविधांच्या परिरक्षणाची आणि त्या क्षेत्रात ज्या इतर सोयीसुविधा महानगर प्राधिकरणाकडून पुरविण्यात आलेल्या नसतील परंतु त्याच्या मते, महानगर प्राधिकरण व ते स्थानिक प्राधिकरण यांच्यामध्ये मान्य करण्यात येतील अशा अटी व शर्तींवर त्या पुरविल्या पाहिजेत आणि जेथे अशा अटी व शर्ती मान्य नसतील तेथे स्थानिक प्राधिकरण व महानगर प्राधिकरण या दोन्हींशी विचारविनिमय करून राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तींवर, अशा इतर सोयीसुविधा पुरविण्याची अशी जबाबदारी घेण्यास, फर्माविता येईल.

कोणत्याही योजनेची अंमलबजावणी करण्याचा महानगर प्राधिकरणाचा अधिकार.

**१७.** (१) कोणत्याही विकास प्रकल्पाच्या किंवा परियोजनेच्या संबंधात, कलम १५ च्या पोट-कलम (१) अन्वये महानगर प्राधिकरणाने दिलेल्या कोणत्याही निदेशाची त्यात निर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाकडून त्या निदेशामधील विनिर्दिष्ट मुदतीत अंमलबजावणी किंवा त्या प्रदेशातील कोणत्याही भागाचा विकास करण्यासाठी अशा कोणत्याही प्राधिकरणाने हाती घेतलेल्या कोणत्याही प्रकल्पाची किंवा परियोजनेची पूर्णतः अंमलबजावणी करण्यासाठी ते प्राधिकरण असमर्थ आहे याबाबत महानगर प्राधिकरणाची खात्री पटली असेल त्या बाबतीत, महानगर प्राधिकरणास स्वतःहून कोणतीही कामे हाती घेता येतील आणि अशा विकास प्रकल्पांची किंवा, यथास्थिति, अशा परियोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी कोणताही खर्च करता येईल, आणि त्या प्राधिकरणाकडून तो खर्च वसूल करता येईल.

(२) महानगर प्राधिकरणास, राज्य शासनाकडून निदेश देण्यात येईल त्याप्रमाणे, प्रादेशिक योजनेनुसार प्रदेशातील विकासाचे कोणतेही काम हाती घेता येईल आणि अशा कामाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असेल असा खर्च करता येईल. राज्य शासनाच्या मते,—

(क) असे काम हाती घेण्यासाठी तेथे इतर कोणतेही समुचित प्राधिकरण नसेल, किंवा

(ख) तेथे असे प्राधिकरण असेल, परंतु असे काम हाती घेण्याची त्याची इच्छा नसेल किंवा असे काम हाती घेण्यास ते असमर्थ असेल, किंवा

(ग) महानगर प्राधिकरणाने, त्याच्याकडे असे काम सोपविण्यासाठी राज्य शासनाला विनिर्देशपूर्वक विनंती केली असेल केवळ त्या बाबतीतच, असे निदेश महानगर प्राधिकरणाला देता येतील.

(३) महानगर प्राधिकरणाकडून पोट-कलम (१) अन्वये कोणतेही काम हाती घेण्यात आले असेल त्या बाबतीत, अशा कामाची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ, महानगर प्राधिकरणास, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाकडून त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये ज्या अधिकारांचा वापर करता येईल असे सर्व अधिकार असल्याचे मानण्यात येईल.

(४) महानगर प्राधिकरणास, पोट-कलमे (१) व (२) च्या प्रयोजनार्थ, महानगर प्रदेशातील कोणत्याही क्षेत्राचे सर्वेक्षण हाती घेता येईल आणि त्या प्रयोजनार्थ, पुढील कोणत्याही गोष्टी करणे हे महानगर प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्यासाठी किंवा सेवकासाठी कायदेशीर असेल,—

(क) कोणत्याही भूमीमध्ये किंवा भूमीवर प्रवेश करणे आणि अशा भूमीची पातळी काढणे ;

(ख) भूपृष्ठाखालील मृदा खोदणे किंवा तीमध्ये विंधणे ;

(ग) चिन्हे लावून व चर खोदून भू-पातळी व हद्दींच्या खुणा करणे ;

(घ) जेथे अन्यथा सर्वेक्षण पूर्ण केले जाऊ शकत नाही आणि भू-पातळी काढली जाऊ शकत नाही व हद्दींवर खुणा केल्या जाऊ शकत नाहीत, तेथे कोणतेही कुंपण किंवा झाडे झुडपे तोडणे व तो भूभाग मोकळा करणे.

(५) उपरोक्त पोट-कलम (४) मध्ये दिलेल्या प्रयोजनार्थ, कोणत्याही भूमीवर प्रवेश करण्यापूर्वी, महानगर प्राधिकरण किंवा त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी, विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने तसे करण्याचा आपला उद्देश असणारी नोटीस देईल.

विवक्षित कंपन्यांच्या किंवा सहकारी संस्थांच्या भाग भांडवलासाठी अभिदान देण्याचा महानगर प्राधिकरणाचा अधिकार.

**१८.** (१) महानगर प्राधिकरणास,—

(क) कंपनी अधिनियम, २०१३ अन्वये विधिसंस्थापित असलेल्या कोणत्याही सार्वजनिक मर्यादित कंपनीच्या किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये मर्यादित दायित्वासह सहकारी संस्थांच्या भाग भांडवलात अभिदान देता येईल ; किंवा (२०१३ चा १८. १९६१ चा महा. २४.)

(ख) या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखालील प्राधिकरणाची कर्तव्ये व कार्ये यांना प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे हितावह असतील अशा कोणत्याही सेवा देण्याच्या किंवा अशी कोणतीही कर्तव्ये पार पाडण्याच्या उद्देशाने ज्याचे विधिसंस्थापन केले असेल किंवा नोंदणी केली असेल किंवा प्रवर्तन केले असेल अशा, भारतीय न्यास अधिनियम, १८८२ अन्वये निर्माण केलेल्या न्यासाच्या किंवा महाराष्ट्र विश्वस्तव्यवस्था अधिनियमान्वये नोंदणी केलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी केलेल्या संस्थेच्या मूळ निधीत, अंशदान करता येईल : (१८८२ चा २. १९५० चा २९. १८६० चा २१.)

परंतु, एका वर्षातील अशा अभिदानाची किंवा अंशदानाची रक्कम, ही मागील पूर्ववर्ती वर्षामधील प्राधिकरणाच्या निव्वळ उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही.

(२) महानगर प्राधिकरणास, प्रकल्प, परियोजना, धोरण अंमलात आणण्याच्या किंवा त्यांचे व्यवस्थापन करण्याच्या आणि त्याबद्दलच्या समभागांच्या प्रयोजनार्थ खाजगी भागीदाराबरोबर संयुक्त प्रकल्प उपक्रम निर्माण करण्याचा अधिकार असेल.

**१९.** (१) प्राधिकरणास, महानगर प्रदेशातील संबंधित स्थानिक प्राधिकरणाशी विचारविनिमय करून, महानगर प्रदेशातील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या प्रादेशिक हद्दींमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्याच्या हेतूने, कोणताही प्रकल्प किंवा परियोजना तयार करता येईल. महानगर प्रदेशातील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली असलेल्या क्षेत्रामध्ये सुविधा पुरविण्याचा प्राधिकरणाचा अधिकार.

**स्पष्टीकरण :—**या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, "पायाभूत सुविधा" या संज्ञेचा अर्थ, रस्ते, मार्ग, पूल आणि परिवहनाची व दळणवळणाची अन्य कोणतीही साधने, आणि अशा पायाभूत सुविधा प्रकल्पाची किंवा परियोजनेची अंमलबजावणी करण्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक कामे, असा आहे आणि त्यामध्ये त्या गोष्टींचा समावेश होतो.

(२) पोट-कलम (१) अन्वये प्रकल्प व परियोजना तयार करण्याच्या व त्यांची अंमलबजावणी
१९४९ चा ५९. करण्याच्या प्रयोजनार्थ, महानगर आयुक्त व प्राधिकरण यांना, अनुक्रमे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम या अन्वये महानगरपालिका आयुक्त असल्याचे मानण्यात येईल आणि ते उक्त अधिनियमांखालील महानगरपालिका आयुक्ताच्या व महानगरपालिकेच्या अधिकारांचा वापर करतील.

१९७१ चा महा. २८. (३) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१) अन्वये प्रकल्प व परियोजना तयार करण्याच्या व त्यांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ, महानगर आयुक्तास, उक्त अधिनियमाअन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण असल्याचे मानण्यात येईल, आणि त्यास, उक्त प्रयोजनांसाठी शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, घोषित करील असे, उक्त अधिनियमाखालील संबंधित झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे सर्व अधिकार असतील आणि तो त्याची सर्व कर्तव्ये पार पाडील.

१९५८ चा ६५. (४) महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम याच्या कलम २० मध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, प्राधिकरणास, त्याने पुरविलेल्या सोयी सुविधांचा वापर करण्यासाठी पथकर आकारता येईल :

परंतु, त्या कराची रक्कम, प्राधिकरणाने अशा प्रकल्पावर किंवा परियोजनेवर केलेल्या भांडवली नियतव्ययापेक्षा किंवा खर्चापेक्षा आणि तो वसूल करण्यासाठी केलेल्या खर्चापेक्षा अधिक असणार नाही.

**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी "भांडवली नियतव्यय" या शब्दप्रयोगाला, महाराष्ट्र
सन १९५८ चा ६५. मोटार वाहन कर अधिनियम याच्या कलम २० च्या पोट-कलम (१अ) च्या स्पष्टीकरणात जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल.

## प्रकरण पाच

## वित्तव्यवस्था, अर्थसंकल्प आणि लेखे

**२०.** (१) महानगर प्रदेश विकास निधी या नावाचा महानगर प्राधिकरणाचा एक निधी असेल. त्यामध्ये प्राधिकरणाला प्राप्त झालेल्या सर्व रकमा जमा करण्यात येतील, ज्यामध्ये पुढील रकमांचादेखील समावेश असेल,— महानगर प्राधिकरणाचे निधी.

(क) राज्य योजनेत समाविष्ट केलेल्या योजनांनुसार आणि या बाबतीत यथोचितरीत्या केलेल्या विनियोजनानुसार राज्य शासन निश्चित करील अशा हप्त्यांमध्ये, प्राधिकरणाने स्थापन

करावयाच्या फिरत्या निधीसाठी रुपये दहा कोटीपेक्षा कमी नसेल इतक्या रकमेचे राज्य शासनाकडून करण्यात येणारे अंशदान. ते अंशदान, राज्य शासन वेळोवेळी मान्यता देईल अशा नियोजित विकासासाठी प्राधिकरणाकडून वापरले जाईल ;

(ख) राज्य शासनाकडून प्राधिकरणाला प्रदान करण्यात येतील अशा अन्य रकमा ;

(ग) केंद्र सरकारकडून किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाकडून किंवा अभिकरणाकडून प्राधिकरणाला प्रदान करण्यात येतील अशा रकमा ;

(घ) प्रकरण सहा खाली आकारलेल्या कोणत्याही उपकराच्या उत्पन्नातून राज्य शासनाने त्याच्या विनियोगासाठी दिलेल्या रकमा ;

(ङ) प्रकरण सहा खाली आकारलेल्या कोणत्याही सुधार आकाराचे उत्पन्न ;

(च) या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये प्राधिकरणास प्राप्त झालेली सर्व फी, परिव्यय व आकार ;

(छ) जमिनी, इमारती व अन्य चल व अचल मालमत्ता, यांच्या विल्हेवाटीपासून आणि अन्य व्यवहार यापासून प्राधिकरणाला प्राप्त झालेल्या सर्व रकमा ;

(ज) प्राधिकरणाने कर्जाऊ घेतलेल्या सर्व रकमा ;

(झ) भाडे व नफा याद्वारे किंवा अन्य कोणत्याही रीतीने किंवा अन्य कोणत्याही साधनाद्वारे प्राधिकरणाला प्राप्त झालेल्या सर्व रकमा.

(२) महानगर प्राधिकरणास, विहित करण्यात येईल अशी त्याच्या निधीतील रक्कम, भारतीय स्टेट बँकेमधील किंवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये किंवा राज्य शासनाने या संबंधात मान्यता दिलेल्या कोणत्याही बँकेमधील चालू खात्यात किंवा ठेव खात्यात ठेवता येईल आणि उक्त रकमेपेक्षा अधिक असलेली कोणतीही रक्कम, राज्य शासनाकडून मान्यता देण्यात येईल अशा रीतीने गुंतवण्यात येईल.

(३) या बाबतीत केलेल्या विनियमांद्वारे प्राधिकृत करण्यात येईल त्याप्रमाणे महानगर प्राधिकरणाच्या अशा अधिकाऱ्यांकडून अशी खाती चालविण्यात येतील.

(४) (क) महानगर प्रदेशातील सर्व भारांपासून मुक्त अशा शासकीय जमिनी, राज्य शासन, त्यास योग्य वाटतील अशा अटी व शर्तींवर प्राधिकरणाला उपलब्ध करून देईल आणि प्राधिकरण, त्या प्रदेशाला त्या त्या वेळी लागू असलेल्या मंजूर प्रादेशिक योजनेनुसार किंवा विकास योजनेनुसार, पायाभूत सुविधांची तरतूद करण्यासाठी निधी उभारण्याचा स्रोत म्हणून अशा जमिनींचा वापर करील.

(ख) प्राधिकरणास, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाच्या कलम १२६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये अर्जदेखील करता येईल.

कर्ज निधी. **२१.** (१) महानगर प्रदेश विकास निधीचा एक भाग म्हणून, महानगर प्राधिकरण,—

(क) कर्जदाराने कर्जावर भरलेल्या व्याजासहित कर्ज परतफेडीच्या सर्व हप्त्यांसह त्याने कर्जाऊ दिलेल्या सर्व रकमा परत मिळविणे ;

(ख) स्थानिक प्राधिकरणे व इतर प्राधिकरणे किंवा व्यक्ती यांना कर्ज किंवा अग्रिम म्हणून प्राधिकरणाने उपलब्ध करून द्यावयाच्या सर्व रकमांची तरतूद करणे ;

(ग) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी प्राधिकरणाने दिलेल्या कर्जाची परतफेड करणे ; आणि

(घ) प्रकल्प व परियोजना यांवरील खर्च भागविणे,

याकरिता बँकेत स्वतंत्र खाती उघडून एक कर्ज निधी स्थापन करील.

(२) कर्जनिधीच्या संबंधातील सर्व बाबींचे, या बाबतीत करण्यात आलेल्या विनियमांद्वारे नियमन करण्यात येईल.

**२२.** (१) महानगर प्राधिकरण राखीव निधीकरिता तरतुदी करील व त्यास, त्याला योग्य वाटेल अशा विशेषरीत्या निर्देशिलेल्या इतर निधींसाठीदेखील तरतूद करता येईल. राखीव व इतर निधी.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेल्या निधींचे व्यवस्थापन, वेळोवेळी हस्तांतरित करावयाच्या रकमा, त्याच्या जमा रकमा व त्यात अंतर्भूत असलेल्या रकमेचे उपयोजन, महानगर प्राधिकरणाकडून निर्धारित करण्यात येईल.

**२३.** महानगर प्राधिकरणाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, निधी व इतर मत्ता, या अधिनियमाच्या तरतुदींच्या प्रयोजनार्थ व त्या तरतुदींच्या अधीन राहून, त्याच्याकडून धारण करण्यात येतील आणि त्यांचे उपयोजन करण्यात येईल. निधी, इत्यादींचे उपयोजन.

**२४.** महानगर प्राधिकरणास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी किंवा त्याने घेतलेल्या कोणत्याही कर्जाच्या व्यवस्थापनासाठी, जेथवर राज्य शासनाची हमी किंवा पत्राची आवश्यकता नसेल तेथवर, त्यास योग्य वाटेल अशा समुचित दराने व अशा शर्तींवर कोणत्याही रकमेचे कर्ज काढता येईल. महानगर प्राधिकरणाचे कर्ज घेण्याचे अधिकार.

**२५.** महानगर प्राधिकरण, महानगर प्रदेशातील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला किंवा इतर प्राधिकरणाला कलम १३ च्या कोणत्याही प्रयोजनांसाठी अनुदाने, अग्रिमे किंवा कर्जे देण्यास किंवा त्यांच्या बरोबर खर्च वाटून घेण्यास सक्षम असेल आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९.) किंवा अशा स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा इतर प्राधिकरणाच्या संबंधातील कोणताही कायदा यांमध्ये कोणतेही निर्बंध अंतर्भूत असल्यास त्यांच्या अधीनतेने, अशी अनुदाने, अग्रिमे किंवा कर्जे किंवा खर्चाचा भाग, महानगर प्राधिकरण अशा इतर प्राधिकरणांशी विचारविनिमय करून वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा अटी व शर्तींच्या अधीनतेने, स्वीकारणे हे अशा इतर प्राधिकरणासाठी कायदेशीर असेल. प्रकल्प व परियोजना यांना वित्तपुरवठा करण्याचे व त्यासाठी शर्ती लादण्याचे महानगर प्राधिकरणाचे अधिकार.

**२६.** राज्य शासनास, त्यास लादणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीनतेने, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, महानगर प्राधिकरणाने उभारलेल्या किंवा दिलेल्या किंवा त्याच्याकडे हस्तांतरित केलेल्या कोणत्याही कर्जाच्या मुद्दलाच्या व त्यावरील व्याजाच्या परतफेडीची हमी देता येईल : प्राधिकरणाने घेतलेल्या किंवा दिलेल्या कर्जास शासनाची हमी.

परंतु, प्राधिकरणाने ते कर्ज राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने उभारले असेल, दिले असेल किंवा ते हस्तांतरित केले असेल त्या बाबतीत फक्त परतफेडीची हमी लागू असेल :

परंतु आणखी असे की, राज्य शासन, कलम २४ च्या अन्वये महानगर प्राधिकरणाने उभारलेल्या किंवा दिलेल्या किंवा त्याच्याकडे हस्तांतरित केलेल्या कोणत्याही कर्जाचे मुद्दल व त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यासाठी हमी देणार नाही.

लेखे व लेखापरीक्षा.

**२७.** (१) महानगर प्राधिकरण या बाबतीत केलेल्या विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने लेखे ठेवील.

(२) महानगर प्राधिकरणाच्या लेख्यांची मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखे याच्याकडून किंवा राज्य शासनाने वेळोवेळी नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही लेखा परीक्षकाकडून लेखापरीक्षा करण्यात येईल.

(३) विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येईल अशा रीतीने लेखापरीक्षा करण्यात येईल.

(४) लेखापरीक्षक आपला लेखापरीक्षा अहवाल महानगर प्राधिकरणाला सादर करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाला अग्रेषित करील.

अर्थसंकल्प.

**२८.** (१) प्राधिकरणाचा सदस्य-सचिव, महानगर प्राधिकरणाच्या अंदाजित जमा व संवितरित रकमा दर्शविणाऱ्या पुढील वित्तीय वर्षाच्या संबंधातील त्याचे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा मुदतीत दर वर्षी तयार करील आणि ते मान्यतेसाठी महानगर प्राधिकरणाला सादर करील.

(२) प्राधिकरण वार्षिक भांडवली अर्थसंकल्पासदेखील मान्यता देईल.

(३) सदस्य-सचिव, त्याने अशा रीतीने तयार केलेले अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व भांडवली अर्थसंकल्प आणि महानगर प्राधिकरणाने मान्यता दिलेले अर्थसंकल्प याच्या प्रती राज्य शासनाला अग्रेषित करील.

वार्षिक अहवाल.

**२९.** महानगर प्राधिकरण, प्रत्येक वर्षाच्या (३१ मार्च रोजी संपणाऱ्या) अखेरीनंतर, आधीच्या वर्षामधील त्याच्या कामकाजाचा अहवाल तयार करील आणि तो ३० नोव्हेंबरपूर्वी राज्य शासनाला सादर करील व राज्य शासन, अशा अहवालाची एक प्रत विधानमंडळासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

प्राधिकरणाने तोट्यात कामे पार न पाडणे.

**३०.** महानगर प्राधिकरण या अधिनियमाखालील आपली कोणतीही कामे तोट्यात करणार नाही आणि ते तोट्यात पूर्ण करण्यास भाग पाडणार नाही. कोणत्याही वित्तीय वर्षातील महानगर प्रदेश विकास निधीतील कोणतीही तूट प्राधिकरणाकडून लगतनंतरच्या पुढील वित्तीय वर्षाच्या आत भरून काढण्यात येईल.

## प्रकरण सहा

## **करविषयक अधिकार**

जमिनी व इमारती यांवर उपकर बसविण्याचे अधिकार.

**३१.** (१) राज्य शासनास, महानगर प्राधिकरणाकडून आलेल्या विनंतीवरून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, महानगर प्रदेशातील किंवा त्याच्या कोणत्याही भागातील जमिनी व इमारती यांवर, राज्य शासन निश्चित करील अशा, मालमत्तेच्या पट्टीयोग्य मूल्याच्या पाच टक्क्यांहून अधिक नसलेल्या दराने उपकर बसविता येईल :

परंतु, केंद्र सरकार, राज्य शासन किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण यांच्याकडे निहित असलेल्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली किंवा ताब्यात असलेल्या कोणत्याही जमिनी अथवा इमारती यांना उपकरातून सूट देण्यात येईल.

(२) निरनिराळ्या क्षेत्रांसाठी व निरनिराळ्या वर्गांसाठी मालमत्तेकरिता असलेल्या निरनिराळ्या दराने असे उपकर बसविता येतील.

(३) ज्या स्थानिक प्राधिकरणाच्या क्षेत्रात मालमत्ता स्थित असतील त्यांवर जणू काही त्या स्थानिक प्राधिकरणाने त्याचे नियमन करणाऱ्या कायद्यानुसार मालमत्ता कर बसविला होता त्याप्रमाणे अशा स्थानिक प्राधिकरणाकडून उपकर वसूल करण्यात येईल आणि वसुली आकार म्हणून विहित करण्यात येईल असा त्याचा भाग त्यातून वजा करून तो, प्रथमतः राज्याच्या एकत्रित निधीत जमा करण्यात येईल.

(४) राज्य शासन, राज्य विधानमंडळाने, याबाबत कायद्याद्वारे विनियोजन केल्यानंतर, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ प्राधिकरणाकडून विनियोग केला जाण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा केलेल्या उपकराच्या निव्वळ रकमेइतक्या उपकराच्या उत्पन्नातील रक्कम प्राधिकरणाला प्रदान करील.

(५) जमीन मालक, महानगर प्रदेशात स्थित असलेल्या कोणत्याही जागेच्या बाबतीत, या कलमान्वये बसविण्यात आलेल्या उपकराचे, त्याने प्रदान केल्यामुळे, जागेच्या भाड्यात कोणतीही वाढ करण्यास हक्कदार असेल.

२००० चा महा. १८. **स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "भाडे" याचा अर्थ, महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ यामध्ये विनिर्दिष्ट केलेले भाडे, असा आहे.

**३२.** (१) कोणत्याही क्षेत्रात महानगर प्राधिकरणाकडून, अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या कोणत्याही विकास प्रकल्पाचा किंवा परियोजनेचा परिणाम म्हणून त्या क्षेत्रातील कोणत्याही जमिनीचे मूल्य वाढले असेल अथवा वाढेल असे महानगर प्राधिकरणाचे मत असेल त्या बाबतीत, महानगर प्राधिकरण जमीन मालकावर किंवा त्यात हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर विकास प्रकल्प किंवा परियोजनेची अंमलबजावणी करण्यात आल्याच्या परिणामी, त्या जमिनीचे मूल्य वाढण्याच्या बाबतीतील सुधार आकार बसविण्यास हक्कदार असेल. सुधार आकार बसविण्याचा महानगर प्राधिकरणाचा अधिकार.

(२) असा सुधार आकार हा, विकास प्रकल्पाची किंवा परियोजनेची अंमलबजावणी पूर्ण झाल्यावर त्या जमिनीचे जणू काही जमिनीवरून इमारती हटवण्यात आल्या होत्या असे समजून अंदाजित केले असेल ते मूल्य, अशा अंमलबजावणीच्या लगतपूर्वी त्या जमिनीचे तशाच रीतीने अंदाजित केले असेल त्या मूल्यापेक्षा जेवढ्या रकमेने अधिक होत असेल त्या रकमेच्या जास्तीत जास्त निम्म्या रकमेएवढा असेल :

परंतु, महानगर प्राधिकरण, कोणत्याही जमिनीवर सुधार आकार बसविताना, विकास प्रकल्पापासून किंवा परियोजनेपासून जमिनीला उपार्जित होणाऱ्या फायद्याची व्याप्ती व स्वरूप आणि या बाबतीत केलेल्या नियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील असे अन्य घटक विचारात घेईल.

(३) जी कोणतीही जमीन शासन, प्राधिकरण किंवा इतर स्थानिक प्राधिकरण यांची मालमत्ता असेल अशा कोणत्याही जमिनीच्या संबंधात शासन, प्राधिकरण किंवा इतर स्थानिक प्राधिकरण यांच्याकडून कोणतेही सुधार अंशदान देय असणार नाही.

महानगर प्राधिकरणाकडून सुधार आकारांचे निर्धारण.

**३३.** (१) सुधार आकाराची रक्कम निर्धारित करणे शक्य व्हावे म्हणून कोणत्याही विशिष्ट विकास प्रकल्पाला किंवा परियोजनेला पर्याप्त रीतीने प्रस्तुत करण्यात आले असल्याचे महानगर प्राधिकरणाला दिसून येईल तेव्हा महानगर प्राधिकरणास, या बाबतीत काढलेल्या आदेशाद्वारे असे घोषित करता येईल की, सुधार आकार निर्धारित करण्याच्या प्रयोजनार्थ विकास प्रकल्पाची किंवा परियोजनेची अंमलबजावणी पूर्ण करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानंतर ते, निकटच्या पूर्ववर्ती कलमान्वये महानगर प्राधिकरणाने त्या जमिनीच्या संबंधात सुधार आकाराची रक्कम निर्धारित करण्याचे योजले असल्याबाबत त्या जमिनीच्या मालकाला किंवा तीत हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला लेखी नोटीस देईल.

(२) महानगर प्राधिकरण, नंतर संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, अशा व्यक्तीकडून देय असलेल्या सुधार आकाराची रक्कम निर्धारित करील आणि अशी व्यक्ती, महानगर प्राधिकरणाकडून अशा निर्धारणाची लेखी नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत, त्याला ते निर्धारण मान्य असल्याचे किंवा ते अमान्य असल्याचे एका लेखी प्रतिज्ञापत्राद्वारे महानगर प्राधिकरणाला कळवील.

(३) महानगर प्राधिकरणाने प्रस्तावित केलेले निर्धारण पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत संबंधित व्यक्तीने मान्य केले असेल तेव्हा, असे निर्धारण हे अंतिम असेल.

(४) जर संबंधित व्यक्तीने ते निर्धारण अमान्य केले असेल किंवा पोट-कलम (२) अन्वये त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत आवश्यक असलेली माहिती महानगर प्राधिकरणाला देण्यात कसूर केली असेल तर, ती बाब कलम ३४ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने लवादाकडून निर्णीत करण्यात येईल.

लवादाकडून सुधार आकार निश्चित करणे.

**३४.** कलम ३३ च्या पोट-कलम (४) मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींचे निर्धारण करण्यासाठी, लवाद व समेट अधिनियम, १९९६ खालील लवादासंबंधातील तरतुदी लागू असतील. १९९६ चा २६.

सुधार आकार प्रदान करणे.

**३५.** (१) या अधिनियमान्वये बसविण्यात आलेला सुधार आकार, नियमांद्वारे निश्चित करण्यात येतील अशा संख्येतील हप्त्यांमध्ये देय असेल आणि त्यातील प्रत्येक हप्ता हा निश्चित करण्यात येईल अशा मुदतीत व अशा रीतीने देय असेल.

(२) सुधार आकाराच्या कोणत्याही थकबाकीवर विहित केलेल्या दराने व्याज देय असेल, आणि ते व्याज जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीयोग्य असेल.

सुधार आकार हा, जमिनीवरील प्रथम भार असणे.

**३६.** (१) सुधार आकाराचे प्रदान करण्यासाठी पात्र असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, आपल्या विकल्पानुसार महानगर प्राधिकरणाला त्याचे प्रदान करण्याऐवजी जमिनीतील तिच्या हितसंबंधावरील एक भार म्हणून उक्त अदत्त प्रदान करण्यासाठी प्राधिकरणाबरोबर करार करता येईल. विहित दराने व्याजाचे निरंतर प्रदान करण्याच्या अधीन राहून, अशा व्याजाचे पहिले वार्षिक प्रदान नियमांद्वारे निश्चित करण्यात येईल अशा मुदतीत व अशा रीतीने करण्यात येईल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीने, पहिल्या व्याजाचे प्रदान ज्या दिनांकास केले असेल त्या दिनांकापासून दहा वर्षांच्या कालावधीच्या आत, तिला, कोणत्याही वेळी, संपूर्ण सुधार आकार एक रकमी भरता येईल, आणि त्यानंतर तिने केलेला करार समाप्त होईल व जमिनीतील तिच्या हितसंबंधावर तिने निर्माण केलेला भार देखील समाप्त होईल.

(२) सुधार आकाराच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून देय असलेले प्रत्येक प्रदान, आणि पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला प्रत्येक आकार हा, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु, शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या देय असलेल्या कोणत्याही प्रदानास अधीन राहून, अशा जमिनीतील अशा व्यक्तीच्या हितसंबंधावरील पहिला भार असेल.

## प्रकरण सात

## महानगर प्राधिकरणाला विवक्षित अधिनियमिती फेरबदलासह किंवा फेरबदलाविना लागू असणे किंवा त्यांपासून सूट मिळणे.

**३७.** अनुसूचीत नमूद केलेले अधिनियम, महानगर प्राधिकरणाला फेरबदलांसह किंवा त्याविना लागू होतील, किंवा ते त्याला लागू होणार नाहीत, किंवा त्या अनुसूचीत नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत व रीतीने त्यांमध्ये सुधारणा करण्यात येतील.

प्राधिकरणाला विवक्षित अधिनियम विवक्षित फेरबदल इत्यादींसह लागू असणे.

## प्रकरण आठ

## संकीर्ण

**३८.** (१) जेथे प्राधिकरणास देय असलेली कोणतीही रक्कम (महानगर प्राधिकरणाच्या कोणत्याही जागेच्या संबंधात देय असलेले भाडे वगळून)–मग ती कोणत्याही व्यक्त किंवा ध्वनित कराराखालील किंवा अन्यथा कितीही असो–नियत दिनांकास किंवा त्यापूर्वी देण्यात आली नसेल,–

प्राधिकरणाला देय असलेल्या रकमांची जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुली करणे.

(क) आणि तिची मागणी विवादित नसेल त्याबाबतीत प्राधिकरणाने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेली व्यक्ती, आपल्या सहीनिशी असलेल्या प्रमाणपत्रात प्राधिकरणाला देय असेल किंवा, यथास्थिति, प्राधिकरणाने मागणी केली असेल ती रक्कम दर्शवून ते प्रमाणपत्र जिल्हाधिकाऱ्याला पाठवील ; आणि त्यानंतर जिल्हाधिकारी, ती देय असलेली किंवा मागणी केलेली रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करील ;

(ख) आणि ती मागणी विवादित असेल त्या बाबतीत तो प्रश्न जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा त्याच्याकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा अन्य अधिकाऱ्याकडे निर्णयार्थ निर्दिष्ट करण्यात येईल, तो त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, आणि ज्या व्यक्तीकडून प्रदान करावयाची रक्कम अभिकथित असेल, त्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, सदर प्रश्नावर निर्णय करील ; आणि त्यावरील तो निर्णय अंतिम असेल, आणि त्याबाबत कोणत्याही न्यायालयात किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणासमोर हरकत घेण्यात येणार नाही. त्यानंतर, जिल्हाधिकारी, देय असल्याचे निर्धारित केलेली ती रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये निर्णयार्थ निर्दिष्ट केलेल्या प्रश्नांवर निर्णय करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती ही, विहित करण्यात येईल अशी असेल.

स्थानिक प्राधिकरणां-कडून आकारण्यात आलेल्या करांऐवजी प्राधिकरणाने एकरकमी अंशदान करणे.

**३९.** (१) या अधिनियमाखाली करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांना अधीन राहून आणि कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात ते स्थानिक प्राधिकरण ज्या सोयीसुविधा पुरविते त्यापैकी कोणत्याही सोयीसुविधा स्वतः महानगर प्राधिकरण पुरवित आहे ही वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतर त्या बाबतीत प्राधिकरण, मालमत्ता करांसहित कोणतेही कर भरण्यास पात्र असणार नाही, मात्र, स्थानिक प्राधिकरणाने आकारलेले सर्व किंवा कोणतेही कर किंवा दिलेल्या सेवा याबद्दल स्थानिक प्राधिकरणाला एक रकमी अंशदान मिळण्यासाठी प्राधिकरणाबरोबर करार करण्याच्या निर्णयाप्रत येणे हे स्थानिक प्राधिकरणासाठी कायदेशीर असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेला कोणताही करार करण्याच्या निर्णयाप्रत येऊ शकत नसेल त्या बाबतीत, ती बाब राज्य शासन निर्धारित करील अशा रीतीने, राज्य शासनाकडे निर्णयार्थ पाठविण्यात येईल आणि राज्य शासन, स्थानिक प्राधिकरणाला किंवा प्राधिकरणाला, किंवा दोघांनाही आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, अशा अंशदानाची रक्कम निश्चित करील. राज्य शासनाचा निर्णय दोन्ही पक्षकारांवर बंधनकारक असेल.

विवक्षित प्रकरणांत प्राधिकरणाची मागणी पूर्ण करण्यासाठी पगारातून किंवा वेतनातून कपात करणे.

**४०.** (१) महानगर प्राधिकरणाशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, करारात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी रक्कम, नियोक्त्याकडून तिला देय असलेल्या पगारामधून किंवा वेतनामधून कपात करण्यास आणि अशा व्यक्तीवर असलेले प्राधिकरणाचे कोणतेही ऋण, किंवा मागणी फेडण्यासाठी अशी कपात केलेली रक्कम, प्राधिकरणाला देण्यास, तिचा नियोक्ता सक्षम असेल, अशी तरतूद असलेला एक करार अशा प्राधिकरणाच्या लाभार्थ करून देता येईल.

(२) असा करार केल्यावर, तो नियोक्ता, प्राधिकरणाने, लेखी मागणी करून, तसे फर्माविल्यास आणि जोपर्यंत असे संपूर्ण ऋण किंवा मागणी चुकती करण्यात आली असल्याबाबत प्राधिकरण कळवीत नाही तोपर्यंत, वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे नियोक्त्याकडून ज्या दिनांकास नियोक्ता पगार किंवा वेतन प्रदान करील त्या दिनांकास जणू काही त्या नियोक्त्याकडून देय असलेल्या पगाराचाच किंवा वेतनाचाच एक भाग होता असे समजून त्या करारानुसार कपात करील, आणि अशी कपात केलेली रक्कम प्राधिकरणाला देईल. १९३६ चा ४.

(३) जर नियोक्ताने पूर्ववर्ती पोट-कलमान्वये केलेली मागणी प्राप्त झाल्यानंतर, कोणत्याही वेळी, अशा व्यक्तीला देय असलेल्या पगारातून किंवा वेतनातून मागणीत विनिर्दिष्ट केलेली रक्कम कपात करण्यात कसूर केली असेल किंवा कपात केलेली रक्कम प्राधिकरणाकडे भरणा करण्यात कसूर केली असेल तर, नियोक्ता त्याबाबतच्या प्रदानासाठी व्यक्तीशः जबाबदार असेल ; आणि ती रक्कम, नियोक्त्याकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे प्राधिकरणाच्यावतीने वसुलीयोग्य असेल.

(४) या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, (संविधानाच्या अर्थांतर्गत) कोणत्याही रेल्वेत व खाणीत आणि तेल क्षेत्रात कामावर असणाऱ्या व्यक्तींना लागू होणार नाही.

राज्य शासनाचे नियंत्रण असणे.

**४१.** (१) महानगर प्राधिकरण, राज्य शासनाने महानगर प्रदेशातील क्षेत्रांच्या विकासासाठी वेळोवेळी तयार केलेल्या धोरणानुसार व निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करील व आपली कर्तव्ये पार पाडील.

(२) प्राधिकरण, या अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाकडून वेळोवेळी देण्यात येतील अशा निदेशांचे पालन करण्यासाठी बांधील असेल.

(३) या अधिनियमाखालील प्राधिकरणाचे अधिकार वापरण्याच्या व त्याची कर्तव्ये पार पाडण्याच्या संबंधात, प्राधिकरण व राज्य शासन यांच्यात कोणताही विवाद उद्‌भवल्यास, त्या बाबीवर राज्य शासन निर्णय करील आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

प्राधिकरणाचा विवरणपत्रे, अहवाल इत्यादी मागविण्याचा अधिकार.

**४२.** महानगर प्राधिकरणास, या अधिनियमाखालील किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखालील आपल्या अधिकारांचा वापर करताना व आपली कर्तव्ये पार पाडताना, त्याला आवश्यक वाटतील अशी कोणतीही विवरणे, लेखाविवरणपत्रे, अहवाल, आकडेवारी किंवा अन्य माहिती महानगर प्रदेशामधील कोणतेही स्थानिक प्राधिकरण, किंवा अन्य प्राधिकरण, किंवा व्यक्ती यांच्याकडून मागविण्याचा अधिकार असेल आणि अशी माहिती पुरविणे अशा प्राधिकरणावर किंवा व्यक्तीवर बंधनकारक असेल.

अधिकार सोपवणे.

**४३.** प्राधिकरणास, त्यास वापरण्यायोग्य असेल असा (विनियम करण्याचा अधिकार खेरीज करून) कोणताही अधिकार, किंवा या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्यास पार पाडावयाचे कोणतेही कार्य, किंवा पार पाडावयाचे कोणतेही कर्तव्य, ठरावाद्वारे, अशा ठरावात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तींना अधीन राहून, महानगर आयुक्ताकडे किंवा कार्यकारी समितीकडे वेळोवेळी सोपवता येईल.

महानगर प्राधिकरणाचे अधिकारी व इतर कर्मचारी लोकसेवक असणे.

१८६० चा ४५. **४४.** महानगर प्राधिकरणाचा प्रत्येक सदस्य, अधिकारी व इतर कर्मचारी आणि या अधिनियमान्वये घटित केलेल्या समित्यांचा प्रत्येक सदस्य हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

पोलिसांनी सहकार्य करणे.

**४५.** महानगर प्रदेशातील पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक, कलम १५ च्या पोट-कलम (४) अन्वये दिलेल्या निदेशाचे पालन करील आणि या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तो स्वतः आणि त्याच्या दुय्यम अधिकाऱ्यांमार्फत महानगर आयुक्ताला सहकार्य करील.

संरक्षण.

**४६.** या अधिनियमान्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या कोणत्याही कृतीसंबंधात महानगर प्राधिकरणाचा कोणताही सदस्य किंवा कोणताही अधिकारी किंवा इतर कर्मचारी व या अधिनियमान्वये घटित केलेल्या समितीचा कोणताही सदस्य यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला, किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

**४७.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाखालील सर्व नियम करण्याच्या अधिकाराचा वापर करील.

(२) या अधिनियमात इतरत्र अंतर्भूत असलेले नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध न येता, राज्य शासनास, सर्वसाधारणपणे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी या अधिनियमाशी सुसंगत असतील असे नियम करता येतील.

(३) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम हे पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन असतील.

(४) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन

अधिवेशनांत मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील आणि **राजपत्रात** असा निर्णय अधिसूचित करतील, तर, तो नियम अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा, यथास्थिति, तो मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे, त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

विनियम करण्याचा अधिकार.

**४८.** महानगर प्राधिकरणास, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने या अधिनियमाखालील विनियमांद्वारे तरतूद करावयाच्या सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी आणि सर्वसाधारणपणे या अधिनियमाखालील त्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याची कार्ये पार पाडण्यासाठी महानगर प्राधिकरणाच्या मते, ज्या बाबींची तरतूद करणे आवश्यक आहे, अशा इतर सर्व बाबींसाठी, या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील.

या अधिनियमाच्या तरतुदींचा अधिभावी परिणाम असणे.

**४९.** इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाच्या तरतुदी, महानगर प्रदेशातील क्षेत्रांच्या विकासाच्या समन्वयनाशी, पर्यवेक्षणाशी जेथवर संबंधित असतील तेथवर त्या अधिभावी असतील.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**५०.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास प्रसंगानुरुप, आदेशाद्वारे, अशी अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या उद्दिष्टांशी व प्रयोजनांशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

निरसन व व्यावृत्ती.

**५१.** (१) महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१६ हा याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०१६ चा महा. अध्या. २२.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## अनुसूची

**(कलम ३७ पहा)**

**एक. महाराष्ट्र सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत) अधिनियम (१९५६ चा २)**

राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की, त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून उक्त अधिनियम, शासकीय जागांसंबंधात तो अधिनियम जसा लागू होतो त्याप्रमाणे महानगर प्राधिकरणाच्या मालकीच्या किंवा त्याने भाडेपट्ट्याने घेतलेल्या जागांसाठी उक्त अधिनियमातील पुढील फेरबदलांना अधीन राहून लागू होईल :—

२०१७ चा महा. ३.

(क) कलम २ मध्ये, खंड (ब) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ब) "प्राधिकरण" याचा अर्थ, महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ अन्वये स्थापन केलेले महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, असा आहे आणि "प्राधिकरणाच्या जागा" याचा अर्थ, त्या प्राधिकरणाच्या मालकीच्या असलेल्या किंवा त्याने भाडेपट्ट्याने घेतलेल्या कोणत्याही जागा, असा आहे ;

(ख) कलम ३ ऐवजी पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल, ते असे :—

"३. राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्याच्या मते, जो अधिकारी उप- जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा कार्यकारी अभियंत्याच्या पदाहून कमी दर्जाचे नाही असे पद धारण करीत आहे किंवा, ज्याने असे पद धारण केले होते अशा एखाद्या अधिकाऱ्याची, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ सक्षम प्राधिकारी म्हणून, नियुक्ती करता येईल आणि अशा एक किंवा अनेक अधिकाऱ्यांची संपूर्ण महानगर प्रदेशासाठी किंवा त्याच्या भागासाठी नियुक्ती करता येईल." ; सक्षम प्राधिकाऱ्यांची नियुक्ती.

(ग) त्या अधिनियमातील "शासकीय जागा" याबाबतचा कोणताही निर्देश हा "प्राधिकरणाच्या जागेचा" निर्देश असल्याचे मानण्यात येईल आणि त्याची कलमे ४, ६ व ९ मध्ये राज्य शासनाबाबतचा निर्देश हा, "प्राधिकरणाचा" निर्देश असल्याचे मानण्यात येईल ;

(घ) कलम ६ मधील, पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) खंड (क) नंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"किंवा

(घ) प्राधिकरणाचा कोणताही कर्मचारी," ;

(दोन) "किंवा, यथास्थिति, स्थानिक प्राधिकरण" या मजकुरानंतर "किंवा प्राधिकरण" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**दोन. महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम, १९६३ (१९६३ चा महा. ४५)**

उक्त अधिनियम, महानगर प्राधिकरणाला किंवा त्या प्राधिकरणाच्या मालकीच्या किंवा त्याच्याकडे निहित असणाऱ्या कोणत्याही जमिनीला किंवा इमारतीला लागू होणार नाही.

**तीन.   महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा ३७).** २०१७ चा महा. ३.

उक्त अधिनियमातील कलम ४० मधील पोट-कलम (१) मध्ये खंड (क) नंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"किंवा

(घ) महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ अन्वये स्थापन केलेल्या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नियुक्ती करता येईल.".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग,
  **मुंबई ४०० ००४.**
  दूरध्वनी : ०२२–२३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९
- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  **पुणे ४११ ००१.**
  दूरध्वनी : ०२०–२६१२ ५८०८, २६१२ ४७ ५९
- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाइन्स,
  **नागपूर ४४० ००१.**
  दूरध्वनी : ०७१२–२५६२ ६१५
- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  **औरंगाबाद ४३१ ००१.**
  दूरध्वनी : ०२४०–२३३१ ४६८, २३३१ ५२५
- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क,
  **कोल्हापूर ४१६ ००३.**
  दूरध्वनी : ०२३१–२६५० ३९५, २६५० ४०२

**आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**